महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संगणक- २०२६/प्र.क्र.०६/का. ७ दिनांक : ०३ फेब्रुवारी, २०२६.

**विषय:- विधि व न्याय विभागातील मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी यांचेकरिता Apple iMac All-in-one संगणक खरेदीसाठी दरपत्रके मागविण्याबाबत.**

विधि व न्याय विभाग (खुद्द) महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई या विभागातील मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी यांना विभागातील कार्यालयीन कामकाजाकरिता ॲपल iMac ऑल इन वन संगणक खरेदी करण्याकरिता मोहोरबंद दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

२. मोहोरबंद लिफाफ्यावर "ॲपल iMac ऑल इन वन संगणक खरेदी" असे स्पष्टपणे लिहिणे आवश्यक आहे. खालील अटी व शर्ती विचारात घेऊन ॲपल iMac ऑल इन वन संगणक पुरविण्याबाबतचे दरपत्रक **तांत्रिक लिफाफा व अतांत्रिक लिफाफा असे दोन स्वतंत्र बंद लिफाफे** (सोबत जोडलेल्या नमुन्यात) कार्यासन अधिकारी (कार्यासन-७), दालन क्रमांक ३५३, तिसरा मजला, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे **दि.१०.०२.२०२६ पर्यंत सायं. ५.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.** त्यानंतर आलेल्या दरपत्रक स्वीकारण्यात येणार नाहीत. दोन लिफाफा पध्दतीने दरपत्रक सादर न केल्यास दरपत्रक ग्राह्य धरण्यात येणार नाही. **सदरचे दरपत्रके** या कार्यासनाच्या ई-मेल वर पाठवू नये. ईमेलवर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

३. निविदा फॉर्मवर निविदाधारकाची सही व शिक्का असणे बंधनकारक आहे.

४. प्राप्त दरपत्रके मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी यांनी दिलेल्या दिनांकास व वेळेला मा. प्रधान सचिव व विधि परामर्शी, पाचवा मजला, मुख्य इमारत, विधि व न्याय विभाग, मंत्रालय, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२ येथे उघडण्यात येतील. संबंधितांना दरपत्रके उघडण्याची दिनांक व वेळ पत्राद्वारे/दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. दरपत्रके मोहोरबंद लिफाफे उघडतेवेळी निविदाधारक स्वत: किंवा त्यांचा एकच प्रतिनिधी उपस्थित राहू शकेल (मंत्रालय प्रवेश नियमानुसार).

अटी व शर्ती:-

१. सदर दरपत्रक GST नोंदणीकृत व अधिकृत ॲपल कंपनीचे उत्पादने/उपकरणे विक्रेते/पुरवठादारांकडूनच स्विकारले जाईल.
२. दरपत्रकात मूळ दर, जीएसटी व इतर कर व एकूण दर इ.बाबी स्पष्ट नमूद करणे बंधनकारक राहील.
३. ॲपल iMac ऑल इन वन संगणक हा अतांत्रिक वित्तीय दरपत्रक प्रपत्र-ब मध्ये नमूद तांत्रिक विनिर्देशानुसार (Technical Specification) असणे आवश्यक आहे.
४. सदरचा iMac ऑल इन वन संगणक हा ॲपल या मूळ उत्पादक कंपनीचाच असावा. सदर सामग्रीचा दर्जा, गुणवत्ता उत्तम असावा. तसेच संगणक नवीन, न वापरलेला व मूळ कंपनीच्या सीलबंद पॅकिंगमध्ये असावा.
५. ॲपल iMac ऑल इन वन संगणकाची Warranty किमान ०५ वर्षे एवढी असावी.
६. एका पुरवठादारास एकच दरपत्रक सादर करता येईल.
७. आपल्या संस्थेने मागील ३ वर्षात शासकीय/निमशासकीय कार्यालयांना ॲपल कंपनीची आय.टी. सामग्री तसेच इतर आय.टी. सामग्री पुरविल्याबाबतचे संबंधित कार्यालयाशी केलेल्या करार, कार्यादेश तसेच समाधानकारक काम केल्याबाबतचे संबधित कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल.
८. सदर संगणक सामग्री विभागास प्राप्त झाल्यानंतर तसेच ते सुस्थितीत कार्यन्वित झाल्याची विभागाची खात्री पटल्यानंतर देयक अदा करण्यात येईल. देयक अदा करण्यास प्रशासकीय कारणास्तव विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही. देयक सादर करतांना रु.१/- चा मूद्रांक लावून देयक सादर करावे. व देयकासोबत अदाता नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.
९. सदर सामग्रीचा पुरवठा आदेश दिल्यानंतर ०२ दिवसांच्या आत विभागास पुरवठा करावा.
१०. दरपत्रके प्राप्त झाल्यानंतर विभागाच्या खरेदी समिती तांत्रिक व आर्थिक मुल्यांकनानुसार एल१ पुरवठादार निश्चित करेल व सदर एल१ पुरवठादारास पुरवठा आदेश निर्गमित करण्यात येईल.
११. कोणतेही एक अथवा सर्व दरपत्रके नाकारण्याचा, संपूर्ण प्रक्रिया पूर्णपणे किंवा दरपत्रक स्विकृतीच्या कोणत्याही टप्पावर कोणतेही कारण न देता थांबविण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार विधि व न्याय विभाग राखून ठेवत आहे. तसेच वादाच्या बाबतीत या विभागाचा निर्णय अंतीम राहील.
१२. संस्थेस/कंपनीस कोणत्याही शासकीय/निमशासकीय/खाजगी विभागातर्फे काळया यादीमध्ये समावेश नसल्याबाबत हमी निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या पुरवठादाराने रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर द्यावी लागेल.

१३.अपूर्ण व उशिरा प्राप्त झालेली किंवा अटींशी विसंगत दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

१४.उपरोक्त अट क्र.१ ते १३ अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रुपये १००/- च्या स्टँम्प पेपरवर पुरवठादाराने सादर करावे.

(शैलेश खाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवड नस्ती, का. ७.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संगणक- २०२६/प्र.क्र.०६/का. ७ दिनांक : ०३ फेब्रुवारी, २०२६.

## लिफाफा १ : तांत्रिक दरपत्रक (प्रपत्र-अ)

| | | |
|---|---|---|
| १. | निविदाधारकाचे/पुरवठादाराचे /संस्थेचे नाव :- | |
| २. | कार्यालयाचा संपूर्ण पत्ता ( पुरावा सोबत जोडण्यात यावा)<br>उदा. महानगरपालिकाचे कर भरणा देयक/दुरध्वनी देयक किंवा विद्युत भरणा देयकांची छायाकिंत प्रत. | |
| ३. | दूरध्वनी (कार्यालय):- | |
| ४. | मोबाईल क्रमांक :- | |
| ५. | ई-मेल:- | |
| ६. | आयकर नोंदणी क्रमांक (पॅन) छायांकित प्रत तसेच मागील तीन वर्षाचे आयकर भरणा करण्यात आलेल्या प्रतीची छायांकित प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी . | |
| ७. | वस्तू व सेवा कर ( GST ) प्रमाणपत्राची छायाकिंत प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी . | |
| ८. | व्यवसाय चालविण्यासाठी आवश्यक असणा-या विविध नोंदण्या:-<br>उदा:- दुकाने व संस्था अधिनियम १९४८: प्रमाणपत्र देणारे कार्यालय/प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत त्याचप्रमाणे उद्योग आधार कार्यालय/ प्रमाणपत्राचा नोंदणी क्रमांक/वैद्यतेची मुदत इ. छायाकिंत प्रत साक्षांकित केलेली सोबत जोडण्यात यावी. | |
| ९. | आपल्या संस्थेने मागील ३ वर्षात शासकीय/निमशासकीय कार्यालयांना ॲपल कंपनीची आय.टी. सामग्री तसेच इतर आय.टी. सामग्री पुरविल्याबाबतचे संबंधित कार्यालयांशी केलेल्या करार प्रती,कार्यादेश तसेच समाधानकारक काम केल्याबाबतचे संबधित कार्यालयाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. | |
| १०. | ॲपल कंपनीचे OEM Authorization प्रमाणपत्र. | |
| ११. | कोणत्याही विभागातर्फे काळया यादीमध्ये समावेश नसल्याबाबत हमी निविदा प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या पुरवठादाराने रु.१००/- च्या स्टँम्प पेपरवर द्यावी लागेल. | |
| १३. | निविदा सूचनेमध्ये नमूद करण्यात आलेल्या सर्व अटी व शर्ती १ ते १३ मान्य असल्याबाबत रु.१००/-च्या स्टँम्प पेपर वरील हमीपत्र. | |

| | | |
|---|---|---|
| १४. | ॲपल iMac ऑल इन वन संगणकाच्या प्रपत्र-ब मध्ये नमूद तांत्रिक विनिर्देशानुसार दर सादर केल्याचे कंपनीचे हमीपत्र. | |

दिनांक : निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

स्थळ :

सूचना:- दरामध्ये गिरवणे (ओव्हररायटिंग) तसेच निविदा कागदपत्रात कोठेही खाडाखोड पांढरी शाई लावणे टाळावे तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी.

निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.

Email ID : lnjd-desk७@mah.gov.in दूरध्वनी क्र ०२२-२२७९३२३०

क्रमांक: संगणक- २०२६/प्र.क्र.०६/का. ७ दिनांक :०३ फेब्रुवारी, २०२६.

लिफाफा २ : अतांत्रिक वित्तीय दरपत्रक (प्रपत्र-ब)

१. निविदाधारकाचे/पुरवठादाराचे पूर्ण नांव : -----------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता : ---------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक :अ) कार्यालय: ------------------- ब)मोबाईल नं. ---------------------

४. E-mail Address: -----------------------------------------------------

सूचना:- दरपत्रक कागदपत्रात कोठेही खाडाखोड, गिरवणे (ओव्हररायटिंग) पांढरी शाई लावणे टाळावे. चुकून तसे करावे लागल्यास पूर्ण स्वाक्षरी करावी. तसे न केल्यास निविदा रद्द करण्याचे अधिकार शासनाने राखून ठेवले आहेत.

| अ. क्र | संगणकाचे नाव | नग | तांत्रिक विनिर्देश | अंदाजित किंमत (GST सह) | दर | GST रुपये | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | ॲपल iMac all in one Computer | ०१ | **Chip:**-Apple M4 chip, 10-core CPU, १०-core GPU, 16-Core Neural Engine,120GB memory bandwith.<br>**Storage**:-512 GB SSD (Configurable to 1 TB Or 2TB).<br>**Memory:-** 16 GB Unified Memory(Configurable to 24GB Or 32GB).<br>**Display**:-60.96 cm (24") 4.5K Retina display, 4480*2520 resolution at 218 pixels per inch with support for 1 billion colours,500 nits brightness. | २,६४,६००/- | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | **Camera**:- 12MP center stage camera with support for Desk view, 1080 HD video recording.<br>**Display support:-** Four Thunderbolt 4 ports.<br>**Input**:-Magic keyboard with touch ID, Magic mouse.<br>**Wireless**:-wifi 6E (802.11ax), Bluetooth 5.3.<br>**Operating System**:-macOS<br>3.5mm headphone jack etc. | | | | |
| २. | MS-Office | 01 | One time purchase for 1PC or Mac, Classic 2024 desktop versions of word, Excel, PowerPoint, Outlook and OneNote, compitable with Windows11, Windows10 or macOS, works with Microsoft teams. | २७,९९९/- | | | |
| | | | | २,९२,५९९/- | | | |

दिनांक : निविदाधारकाचे नाव, स्वाक्षरी व शिक्का.

स्थळ :